महाराष्ट्र शासन
गृह विभाग
कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुनर्वसन

फोन क्र : (०२०) २६१२३५६३
फॅक्सक्र: (०२०) २६१२५८७८
Email ID : igoffice.ro-mh@gov.in
Website : www.mahaprisons.gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

---

**परिपत्रक**

**१ सप्टेंबर हा कारागृह ध्वजदिन म्हणुन साजरा करणेबाबत.**

जा.क्र. अपोमसं/सं.अ./१ सप्टें/कारागृह ध्वज दिन/ ४३७ / २०२२ पुणे १ दिनांक १७.१.२०२२

वाचा -: दिनांक २८.१२.२०२१ रोजी व्हीडीओ कॉन्फरन्सव्दारे झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तांमधील मधील निर्देश क्रमांक १२.

प्रस्तावना- सुधारणा व पुनर्वसन हे महाराष्ट्र कारागृह विभागाचे ब्रीद वाक्य आहे.कारागृहातील गुन्हेगारांच्या विचारसरणीत व वर्तणुकीत सुधारणा करून समाजात त्यांचे योग्य प्रकारे पुनर्वसन करणे हे कारागृह विभागाचे ध्येय आहे.यास्तव कैदी,त्याचे कुंटुबिय, समाज व कारागृह कर्मचारी यांचे मनात कारागृह विभागाप्रती आपुलकीची, आत्मीयतेची भावना निर्माण होणे आवश्यक आहे तसेच १ सप्टेंबर १९६९ रोजी महाराष्ट्राचे तत्कालिन मुख्यमंत्री मा.श्री.वसंतराव नाईक यांनी कारागृह विभागास ध्वज अर्पण केला होता व त्या दिनाचे प्रित्यर्थ १ सप्टेंबर हा दिवस कारागृह ध्वजदिन म्हणुन साजरा करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी हे राष्ट्रीय दिन ज्याप्रमाणे साजरे केले जातात त्याच प्रमाणे १ सप्टेंबर हा दिवस साजरा करावयाचा आहे. कारागृह नियमावलीनुसार प्रत्येक मध्यवर्ती कारागृह इमारतीवर राष्ट्रीय ध्वज प्रत्येक दिवशी फडकावला जातो तसेच जिल्हा कारागृहात कारागृह विभागाचा ध्वज फडकावला जातो.१ सप्टेंबर रोजी नियमावलीनुसार दोन्ही ध्वजांचे रोहन करावयाचे असुन प्रथम राष्ट्रीय ध्वज व नंतर विभागाच्या ध्वजाचे रोहण करावयाचे आहे.याबाबत खालील बाबींचे पालन करण्यात यावे.

१. १ सप्टेंबर रोजी सर्व मध्यवर्ती व जिल्हा कारागृहाचे अधिक्षक तसेच सर्व कारागृह कार्यालयात संस्था प्रमुख यांचे हस्ते राष्ट्रीय ध्वज रोहणानंतर राष्ट्र ध्वजा खाली कारागृह ध्वज फडकावला जाईल, व त्यानंतर राष्ट्रगीत गायले जाईल.सुर्यास्ताला ध्वज खाली उतरविणे.
२. ध्वजारोहण प्रसंगी १५ ऑगस्ट,२६ जानेवारी प्रमाणे रक्षक व कैदी यांची समारंभ संचलने घेण्यात यावीत.
३. ध्वज फडकवितांना व उतरवतांना बिगुल वाजविणे.

४. २५ ऑगस्ट पासुन क्रिडा स्पर्धा वा देशभक्तीपर गीत गायन या सारखे स्पर्धांचे आयोजन करून १ सप्टेंबर रोजी संचलन कार्यक्रमानंतर बक्षिस वितरण कार्यक्रम करावा.

५. १ सप्टेंबर रोजी शक्यतो गळाभेट सारखे उपक्रम आयोजित करण्यात यावे जेणेकरून कैदयांच्या कुटुंबियांच्या मनात कारागृह विभागाबाबत अपुलकीची भावना निर्माण होवु शकेल.

६. कारागृह आहारात सदर दिवशी गोड पदार्थाचा समावेश करावा.तसेच उपाहारगृहातुन स्थानिक परिस्थिती व नियमानुसार उचित पदार्थ तयार करण्यात यावे.

७. अशासकिय संस्थाच्या सहकार्याने नाटक, गीत गायन या सारखे मनोरंजनात्मक करमणुक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

**(अतुलचंद्र कुलकर्णी)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य पुणे. ०१

**प्रति,**

१. अधिक्षक
मध्यवर्ती,जिल्हा,खुले,विशेष कारागृह सर्व
प्राचार्य,किशोर सुधारालय,नाशिक,संपर्क अधिकारी - स्वंतत्रपुर खुली वसाहत,आटपाडी जि.सांगली

२. विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग,मुंबई,
कारागृह उपमहानिरीक्षक,पूर्व विभाग-नागपूर,पश्चिम विभाग-पुणे,मध्य विभाग-औरंगाबाद

३. प्राचार्य,दौलतराव जाधव तुरूंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,पुणे.

प्रत : मा.अपर मुख्य सचिव,(अ व सु),गृह विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांना माहितीस्तव.